# श्री राम राधाकृष्ण मेमोरियल ट्रस्ट, नेरुळ

**दिघा शिक्षाअंगण**

# दिघा शिक्षाअंगण

श्री राम राधाकृष्ण मेमोरियल ट्रस्ट, नेरुळ नवी मुंबई यांनी सुरु केलेल्या दिघा शिक्षाअंगण

या वर्गाचे 2025-26 हे चौथ वर्ष होते. या शिक्षाअंगण वर्गाची सुरुवात 2022 साली झाली होती. शैक्षणिक वर्ष 2024-25 या वर्षी 55 विद्यार्थी शिकत होते. ही सर्व मुल महानगर पालिका शाळेत तर काही खाजगी शाळेत शिकत होते.

या शैक्षणिक वर्षांत इयत्ता दहावीत 7 जन होते.

# दिघा शिक्षाअंगण

- यावर्षी मुलांना विविध विषयांचे बेसिक ज्ञान मिळावे यावर भर देण्यात आला लॉकडाउन नंतर मुलांची शैक्षणिक पात्रता कमी आहे असे दिसून आले. त्यामुळे मराठी, गणित आणि इंग्रजी वर भर देण्यात आला. हे असताना मुलांचे पाढेपाढ करुन घेतले. तसेच विविध उपक्रमाच्या माध्यमातून मुलांची सामाजिक व बौद्धिक पातळी वाढवण्याचा प्रयत्न केला.



# जागतिक पर्यावरण दिन

श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट व स्त्री मुक्ती संघटनेच्या वतीने पर्यावरण दिन साजरा करण्यात आला एकूण उपस्थित संख्या 22 मुलांना पर्यावरण पूरक ओल्या कचऱ्यापासून नैसर्गिक खत कसे तयार केले जाते याची माहिती मुलांना देण्यासाठी दिघा बिंदू माधव नगर येथे महानगरपालिकेच्या प्रोजेक्टवर घेऊन जाण्यात आले तेथे मुलांना नैसर्गिक खत कसे तयार होते ही प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवण्यात आली



# शैक्षणिक साहित्य वाटप

श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दिघा अभ्यास वर्गातील मुलांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. त्यासाठी दिघा अभ्यास वर्गातील मुलांच्या वतीने सरांचे व मॅडमचे तसेच श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टचे खूप खूप आभार💐💐🙏🙏



# रक्षाबंधन दिन

श्री राम राधाकृष्ण मेमोरियल ट्रस्टच्या माध्यमातून दिघा अभ्यासवर्ग इथे रक्षाबंधन हा सण साजरा करण्यात आला त्यावेळी मुलीनी मुलांना राखी बांधून सण साजरा करण्यात आला.



# आषाढी एकादशी

स्त्री मुक्ती संघटना व श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दिघा अभ्यास वर्गातील मुलांची आषाढी एकादशीनिमित्त आषाढी वारीच्या माध्यमातून स्वच्छता वारी काढण्यात आली. मुलांनी वस्तीमध्ये स्वच्छते विषयी घोषवाक्य देऊन लोकांना परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. विविध खेळाच्या माध्यमातून आषाढी वारीचा आनंद लुटला.



# गुरुपौर्णिमा

विद्यार्थी संख्या 45 , गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली मुलांना गुरुपौर्णिमेची माहिती दिली.मुलांनी गुरुपौर्णिमेविषयी गुरुचे महत्व बोधकथा सांगून आपल्या गुरु विषयी असलेला आदर व्यक्त केला तसेच . मुलांचा पहिला गुरु आई असते तर अभ्यास वर्गात मुलांच्या पालकांना बोलवून त्यांना मुलांनी हाताने तयार केलेले फुल देऊन गुरुपौर्णिमा शुभेच्छा दिल्या.




# प्लास्टिकचा वापर करून तयार केलेल्या वस्तू

बिसलरी च्या वतीने मुलांनी प्लास्टिकचा वापर करून तयार केलेल्या वस्तूचे छोटेसे प्रदर्शन मानण्यात आले दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना त्याविषयी मुलांनी माहिती दिली प्लास्टिक पर्यावरणासाठी घातक आहे व ते रिसायकिंगला दिल्यानंतर त्यापासून विविध वस्तू तयार करू शकतात असे देखील सांगितले



# वकृत्व स्पर्धा

आपल्या दिघा अभ्यास वर्गातील श्रद्धा बालाजी गायकवाड या विद्यार्थिनीचा मराठी भाषा दूत या वकृत्व स्पर्धेमध्ये नंबर आला आहे



महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

आयोजित

ठी भाषा युवा दूत ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा -२०

| मांक | नाव | विभाग |
|---|---|---|
| | विशाखा राजरत्न कांबळे | कोकण विभाग |
| | कन्हैया ज्ञानेश्वर ढाकरे | अमरावती विभाग |
| | सागर दत्ता मोहिते | छत्रपती संभाजी न |
| | सानिका संजय उराडे | कोकण विभाग |
| | प्रणव युवराज जाधव | नाशिक विभाग |
| | संस्कृती शंकर इंगुलकर | कोकण विभाग |
| | स्नेहल हिरामण राऊत | पुणे विभाग |
| | प्रीया पानवलकर | बृहन् महाराष्ट्र वि |
| | प्रगती बाळकृष्ण माने | पुणे विभाग |
| | श्रध्दा बालाजी गायकवाड | कोकण विभाग |

AUGUST

# वर्ग विजीट

आज अजित सरांनी दिघा अभ्यास वर्ग विजीट केली मुलांच्या वाचनामध्ये भर पडावी यासाठी श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टच्या वतीने मुलांना वाचन करण्यासाठी गोष्टीची पुस्तके शास्त्रज्ञांची माहिती अशी विविध पुस्तकांचा संच देण्यात आला. यासाठी श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टचे दिघा अभ्यास वर्गातील मुलांच्या वतीने खूप खूप धन्यवाद मानते🙏



# सरस्वती पूजन

सरस्वती पूजन करून. शिक्षणाचची जनक क्रांतीज्योतीसावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून रास गरबा घेण्यात आला. सर्व मुलांनी खूप आनंदाने सहभाग घेतला



# स्वतःची ओळख या मुद्द्यावरील चर्चा

विद्यार्थी संख्या 37 विषय स्वतःची ओळख कशी करावी स्वतः विषयी माहिती घेऊन त्याच्यावर विचार करणे अशा विविध मुद्द्यावर चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले हा विषय घेण्यासाठी स्त्रीमुक्ती संघटनेच्या वतीने रश्मी मॅडम व टी आय सी सुभेद्रा व निशा मॅडम उपस्थित होत्या



# दिवाळी

दिघा शिक्षा अंगण येथे श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दिवाळी पार्टीचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला एकूण 50 विद्यार्थी उपस्थित होते. श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टच्या वतीने अजित सर यांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली. मुलांनी कंदील व विविध रंगाने पण ती सजावट केल्या. विजेत्या विद्यार्थ्यांना अजित सरांच्या हस्ते पारितोषक देण्यात आले



# नाताळ सण

एकूण विद्यार्थी संख्या 42 संपूर्ण शिक्षाच्या वतीने नाताळनिमित्त ऑनलाइन स्टोरी टेलिंग सत्र घेण्यात आले या सत्राच्या माध्यमातून मुलांना गोष्ट व सांताक्लॉज तसेच ग्रीटिंग तयार करण्याचे मार्गदर्शन कृतीद्वारे करून घेण्यात आले



# नवीन वर्षाची पार्टी

विद्यार्थी संख्या 46 नवीन वर्षाचे स्वागत
..💐मुलांचा संकल्प, पार्टी व दक्ष या मुलांचा वाढदिवस होता



# सावित्रीबाई फुले जंयती

सावित्रीबाई फुले यांच्या जंयती निमित्त निबंध स्पर्धा घेण्यात आली व तसेच त्यांची ओवी गायली.



# मकरसंक्रांत

मकर संक्रांत साजरी करण्यात आली. मुलांना माहिती देण्यात आली तसेच मुलांकडून चित्र काढून घेण्यात आले. यावर्षी सार्वत्रिक निवडणूक मतदान प्रक्रिया कशा प्रकारे आहे हे मुलांना थोडक्यात सांगण्यात आले. त्याप्रमाणे पालकांना देखील माहिती द्यावी असे सांगण्यात आले



# शिक्षणास आर्थिक मदत

श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टच्या वतीने सानपाडा येथे सर्व अभ्यास वर्गातील इयत्ता दहावी 60 पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना चेक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला दिघा अभ्यास वर्गातील पाच मुलांना शैक्षणिक मदत करण्यात आली त्यासाठी सर्व विद्यार्थी व पालकांकडून श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टचे खूप खूप आभार की त्यांनी मुलांना शैक्षणिक जीवनासाठी पुढच्या वाटचालीसाठी धनादेश देऊन मदत केली त्याबद्दल🙏🙏



# योगा प्रशिक्षण

सिंथेल च्या वतीने दिघा अभ्यास वर्गातील मुलांना सोबत जागतिक योगा दिन साजरा करण्यात आला या उपक्रमांमध्ये एकूण 50 मुलांनी सहभाग घेतला दोन गटांमध्ये विभागणी करून मुलांना योगा प्रशिक्षण देण्यात आले या उपक्रमाला सिंथेल तर्फे रजनी मॅडम सुरेश सर ,विठ्ठल सर व योगा प्रशिक्षक वैशाली मॅडम उपस्थित होत्या



# प्रजासत्ताक दिन

संपूर्ण शिक्षणाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त ऑनलाइन स्टोरी टेलिंग सत्र एकूण उपस्थित संख्या 40



# महिला दिन

श्री राम राधाकृष्ण मेमोरियल ट्रस्टच्या वतीने महिला दिन साजरा करण्यात आला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून महिलांचे खेळ घेऊन बक्षीस वाटप केले.



# होळी सण

दिघा होळी  साजरा करण्यात आला एकूण विद्यार्थी संख्या 28 मुलांना पाण्याचा वापर व नैसर्गिक रंग तयार करणे याविषयी माहिती देण्यात आली



# राज्यभाषा दिन

मराठी भाषा दिनानिमित्त मुलांकडून स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेमध्ये इंग्रजीत तील शब्दांचा अर्थ मराठीत लेखन करणे या स्पर्धेत विजेत्या मुलांना बक्षीस वाटप करण्यात आले



# विज्ञान दिन

विद्यार्थी संख्या 21 अगस्त्या फाउंडेशनच्या वतीने मुलांसोबत विज्ञान उपक्रम राबवण्यात आला. विज्ञानाची भीती मुलांच्या मनातून निघावी व सोप्या पद्धतीने त्यांना कसं विज्ञान शिकता यावे यासाठी विशाल सरांनी मुलांना दृष्टी सातत्य, न्यूटनचा तिसरा नियम इत्यादी प्रयोग विविध साहित्याच्या माध्यमातून शिकवले



# किशोरवयीन मुलींची मिटिंग

दिघा अभ्यास वर्गात किशोरवयीन मुलींची मासिक मीटिंग घेण्यात आली या मिटींगला एकूण 22 मुली उपस्थित होत्या विषय संघर्ष व येणाऱ्या परिस्थितीवर मात करणे संवादक रश्मी मॅडम



# चित्रपट

स्त्री मुक्ती संघटनेच्या वतीने मुलांना क्रांतीज्योती विद्यालया चित्रपट दाखवण्यात आला



# सहल

अटॉस  व सिन्टेल यांच्यावतीने दिघा अभ्यास वर्गातील मुलांची सहल वॉटर पार्क येथे घेऊन जाण्यात आली मुलांनी खूप एन्जॉय केला



# ORIENTAL COLLEGE OF PHARMACY, SAMPADA

दिघा येथे संपूर्ण शिक्षा च्या वतीनेOriental college of pharmacy,sanpada,Navi Mumbai अवेअरनेस कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पसाठी 10 विद्यार्थी व दोन टीम लीडर उपस्थित होते त्या कॅम्पच्या माध्यमातून मुलांना मध्ये असलेला एकटेपणा, तान तनाव व मैत्री संबंध या विषयावर विविध खेळाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले



# वार्षिक स्नेहसंमेलन

वार्षिक स्नेहसंमेलन 2025-26 आत्मसन्मान



# अम्मा मठ नेरूळ

रोजी अम्मा मठ नेरूळ यांच्यावतीने कळवा व दिघा येथील मुलींना कपडे , मिठाई व फळ वाटप करण्यात आले.



# SUMMER VACATION

Many thanks to Shreeram Radhakrishnan Memorial Trust for providing us with play materials during the summer vacation. # Digha shikshangan #1) BADMINTON :- 2.2) CHESS. :- 1.3) LUDO :- 14) O-X :- 1.5) BUSINESS :- 1.6) PUZZLE :- 2.7) CUBE :- 1.



# आंबेवाटप

श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टच्या वतीने अजित सर्व राहुल सर यांनी दिघा अभ्यास वर्गातील मुलांना आंबेवाटप केले. आंबे खाल्ल्यानंतर त्याची गोळी कुंडीत लावून त्याचे रोप तयार करून झाड वाढवायचे आहे असा सुंदर उपक्रम त्यांनी मुलांना करण्यासाठी सांगितला. तसेच मुलांना राहुल सरांनी अभ्यास संदर्भात मार्गदर्शन केले, दिघा अभ्यास वर्गाच्या वतीने श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्टचे अजित सर्व राहुल सरांचे धन्यवाद त्यांनी मुलांना फळांचा राजा आंबा याची चव चाखण्यासाठी ते आंबे वाटप केल्याबद्दल🙏🙏🙏

